जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण कार्यालयासाठी “आहरण व संवितरण अधिकारी” तसेच “नियंत्रक अधिकारी” घोषित करण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**
**दिव्यांग सक्षमीकरण विभाग,**
**शासन निर्णय, क्रमांक : दिव्यांग-२०२६ / प्र. क्र. १९२/ कार्या -९**

३१ / ३२ / ३५ “ए” विंग, मित्तल टॉवर,
बॅरिस्टर रजनी पटेल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई- ४०००२१.
दिनांक : २८ एप्रिल, २०२६

वाचा :

१) सामान्य प्रशासन विभाग, शासन अधिसूचना, दिनांक १५ डिसेंबर, २०२२
२) दिव्यांग कल्याण विभाग, शासन निर्णय, क्रमांक: दिव्यांग-२०२३/ प्र.क्र.०७/दि.क.४. दिनांक १०.१०.२०२४.
३) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक: इडीडी - २०२१/ प्र.क्र.६३/दि.क.-१. दिनांक १३.०९.२०२२
४) दिव्यांग कल्याण विभाग, शासन निर्णय क्र. दिव्यांग-२०२३/प्र.क्र.०४/ दि.क.२. दिनांक ११.०४.२०२३
५) दिव्यांग कल्याण विभाग, शासन निर्णय क्र. दिव्यांग-२०२५/E-११०८७१६ /प्र.क्र. ४९/ दि.क.२. दिनांक ७.५.२०२५
६) दिव्यांग सक्षमीकरण विभाग, शासन निर्णय क्र. आस्था- २०२५/प्र.क्र. ३१/ कार्यासन-७, दिनांक १३.०३.२०२६
७) विभागाचा समक्रमांकाचा दिनांक २४.०४.२०२६ रोजीचा शासन निर्णय

**प्रस्तावना :-**

सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १५ डिसेंबर, २०२२ रोजीच्या शासन अधिसूचनेनुसार सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामधून दिव्यांग कल्याण विभाग हा स्वतंत्र विभाग निर्माण करण्यात आलेला आहे. विभागांतर्गत क्षेत्रीय कार्यालयासाठी सुरुवातीस शासन निर्णय, दिनांक १०.१०.२०२४ अन्वये पदे मंजूर करण्यात आली होती. तद्नंतर विभागाच्या दिनांक १३.०३.२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये क्षेत्रीय कार्यालयांच्या (आयुक्तालय स्तर, जिल्हा स्तर व महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळ) पदांचा सुधारित आकृतीबंध तयार करण्यात आलेला आहे.

दिव्यांग कल्याण विभाग स्वतंत्र होण्यापूर्वी दिनांक १७.५.२०१० च्या शासन निर्णयान्वये भविष्य निर्वाह निधीचे अंतिम प्रदान मंजूर करण्याचे अधिकार आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे यांच्याकडे ठेवण्यात आले होते. तद्नंतर शासन आदेश, दिनांक १३.९.२०२२ अन्वये महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ९ च्या तरतूदीस अनुसरून विभागांतर्गत शासन मान्यताप्राप्त अशासकीय अनुदानित

दिव्यांगांच्या विशेष शाळा/ कार्यशाळेतील शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधीच्या रकमेच्या अंतिम प्रदानाच्या अधिकारांचे पुनर्प्रदान मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्याकडे आणि मुंबई शहर/ उपनगर यांचेबाबतीत प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण यांच्याकडे सोपविण्यात आले होते.

दिव्यांग सक्षमीकरण विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील स्वतंत्र क्षेत्रीय कार्यालयाचे कामकाज सुरु होण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८, खंड एक मधील नियम १५ (३) मधील तरतुदीस अनुसरुन दिनांक २४.०४.२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये आयुक्त, दिव्यांग कल्याण आयुक्तालय, पुणे यांना दिव्यांग सक्षमीकरण आयुक्तालयासाठी "नियंत्रक अधिकारी" तसेच सहाय्यक संचालक यांना "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात आले आहे.

त्याचप्रमाणे जिल्हा स्तरावर विभागाच्या योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी नव्याने मंजूर केलेल्या सुधारित आकृतीबंधानुसार जिल्हा कार्यालयाच्या वित्तीय कामकाजासाठी आहरण व संवितरण अधिकारी आणि नियंत्रक अधिकारी घोषित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

दिव्यांग सक्षमीकरण विभागांच्या योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी नव्याने मंजूर केलेल्या सुधारित आकृतीबंधानुसार जिल्हा कार्यालयांसाठी खालीलप्रमाणे नियंत्रक अधिकारी आणि आहरण व संवितरण अधिकारी घोषित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | बाब | नियंत्रक अधिकारी | आहरण व संवितरण अधिकारी |
|---|---|---|---|
| १. | वेतन | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सर्व | सहाय्यक आयुक्त, दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय, जिल्हा कार्यालये सर्व |
| २. | भविष्य निर्वाह निधी | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सर्व | मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद सर्व |
| ३. | ३१- सहायक अनुदान (वेतनेतर) व इतर योजनांसाठी | | |

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०४२८१४५२५४६०३५ असा आहे. तसेच सदर शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

SUNANDA MOHANRAO GHADYALE

Digitally signed by SUNANDA MOHANRAO GHADYALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PDWD, 2.5.4.20=FD89208CBC27B202C96467165AC5BC9643515D80BA9EDECAF650DAD6E8311B45, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C5ADFF2513F33AFA9ED70C79C5A4636204D8B8404 0BF2C6C2470D0F20D8DC79D, cn=SUNANDA MOHANRAO GHADYALE
Date: 2026.04.28 14:55:00 +05'30'

**( सुनंदा मो. घड्याळे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :**

१) आयुक्त, दिव्यांग सक्षमीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे,

२) आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे,

३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सर्व
४) प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई,
५) प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपुर,
६) संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
७) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद सर्व
८) सहाय्यक आयुक्त, दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय, जिल्हा कार्यालये सर्व
९) जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व
१०) दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी, दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय, सर्व
११) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१२) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,
१३) जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, सर्व.
१४) निवड नस्ती.